आकाशवाणी पुणे
प्रादेशिक वृत्तविभाग
राष्ट्रीय बातमीपत्र
सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

दिनांकः08.07.2025 वार:मंगळवार

---

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि ब्राझीलच्या राष्ट्रपतींदरम्यान विविध मुद्द्यांवर चर्चा होणार, दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान नामीबियाला रवाना होणार
- अमेरिकेनं आयातशुल्क अंमलबजावणी एक ऑगस्टपर्यंत पुढं ढकलली
- ब्रिक्स हे समावेशक बहुपक्षीयतेला चालना देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ- अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचं प्रतिपादन
- अमेरिकेतील मध्य टेक्सासमध्ये पुरामुळं हाहाकार, ९१ लोकांचा मृत्यू, अनेकजण बेपत्ता
- आणि
- नागालँडमध्ये मुसळधार पावसानं पूर आणि भूस्खलन, मदतकार्य सुरू

मोदी- ब्राझिलिया

रिओ द जिनेरोमधील दोन दिवसांच्या ब्रिक्स शिखर परिषदेनंतर, ब्राझील दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी काल ब्राझिलियामध्ये दाखल झाले. ब्राझीलच्या संरक्षणमंत्र्यांनी त्यांचं स्वागत केलं. ब्राझिलचे राष्ट्रपती लुइझ इनासियोलुला दा सिल्वा यांच्यासमवेत ते आज व्यापार, संरक्षण, ऊर्जा, अंतराळ, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य आदी विविध मुद्द्यांवर चर्चा करणार आहेत.  त्यानंतर ते नामीबियाचे राष्ट्राध्यक्ष नेटुम्बो यांच्या निमंत्रणानुसार  विंडहोकमध्ये पोहोचणार आहेत. मोदी यांचा नामीबियाचा हा पहिलाच दौरा आहे. द्विपक्षीय संबंध वृद्धिंगत करणे आणि सहकार्याच्या विविध क्षेत्रांचा शोध घेणे हा या दौऱ्याचा उद्देश आहे.

ब्रीक्स मोदी

दहशतवादाचा निषेध ही केवळ सोय नाही तर ती आपली मूल्यप्रणाली असली पाहिजे, असं सांगत महत्त्वाच्या खनिजांचा तसंच तंत्रज्ञान आणि पुरवठा साखळीचा वापर कोणत्याही देशानं स्वार्थासाठी किंवा सशस्त्रीकरणासाठी करु नये, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ब्राझीलमध्ये रिओ- दि – जानिरो इथं सुरू असलेल्या ब्रिक्स शिखर परिषदेत शांतता आणि सुरक्षितता यावरील सत्रामध्ये ते काल बोलत होते. या परिषदेत ब्रिक्स देशांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध केला आणि सर्व प्रकारच्या दहशतवादाचा सामना करण्यासाठी आपली वचनबद्धता दर्शवली. ब्रिक्स परिषदेचं अध्यक्षपद पुढच्यावर्षी भारताकडे असणार आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा यंदाच्या परिषदेतला सहभाग आणि ब्राझिल दौरा महत्त्वाचा असल्याचं केंद्रीय आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव दामू रवी यांनी सांगितलं.

सीतारामन

ब्रिक्स हे समावेशक बहुपक्षीयतेला चालना देण्यासाठी एक महत्त्वाचे व्यासपीठ आहे. आज विविध जागतिक संस्था वैधता आणि प्रतिनिधित्वाच्या समस्येचा सामना करत आहेत, अशा वेळी ब्रिक्स देशांनी सहकार्याला बळकटी देऊन, विश्वासार्ह सुधारणांना प्रोत्साहन देऊन नेतृत्व केलं पाहिजे, असं मत अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल रिओ दि जानेरो इथं झालेल्या ब्रिक्स अर्थमंत्र्यांच्या आणि मध्यवर्ती बँकांच्या गव्हर्नरांच्या बैठकीत व्यक्त केलं. व्यापार आणि आर्थिक निर्बंधांना भारताच्या धोरणात्मक प्रतिसादात बाजारपेठांमध्ये विविधता आणणे, पायाभूत सुविधांवर आधारित विकासाला चालना देणे, स्पर्धात्मकता आणि उत्पादकता वाढवण्याच्या उद्देशाने संरचनात्मक सुधारणा लागू करणे यावर लक्ष केंद्रित केलं आहे, असंही त्यांनी सांगितलं. यावेळी सीतारामन यांनी रशियाचे अर्थमंत्री अँटोन सिलुआनोव्ह आणि चीनचे अर्थमंत्री लॅन फोआन यांची भेट घेऊन विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

अमेरिका आयातशुल्क

अमेरिकेकडून नऊ जुलैपासून लागू करण्यात येणाऱ्या आयातशुल्क अंमलबजावणीला आता एक ऑगस्टपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, त्यामुळे जगभरातील अनेक देशांना दिलासा मिळाला आहे. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रम्प यांनी समाज माध्यमाद्वारे देण्यात आलेल्या माहितीनुसार, १४ देशांवरील नवीन आयातशुल्काची रूपरेषा जाहीर करण्यात आली असून, ते एक ऑगस्टपासून लागू होतील. दोन एप्रिल रोजी भारतासह अनेक

देशांना आयातशुल्क लागू करण्याचा निर्णय जाहीर केला होता, परंतु नंतर त्यांची अंमलबजावणी ९० दिवसांसाठी थांबवण्यात आली, ज्यामुळे अनेक देशांना व्यापारी करार करण्यासाठी नऊ जुलैपर्यंत वेळ मिळाला. आता बाधित देशांना अमेरिकेसोबत अंतरिम व्यापार करारांना अंतिम रूप देण्यासाठी अतिरिक्त वेळ मिळाला आहे.

राजनाथसिंह

ऑपरेशन सिंदूर दरम्यान शौर्य आणि स्वदेशात निर्मित उपकरणांच्या क्षमतांचं प्रदर्शन यामुळे आपल्या स्वदेशी उत्पादनांची मागणी जागतिक स्तरावर वाढली असल्याचं संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी म्हटलं आहे. ते काल नवी दिल्लीत आयोजित संरक्षण लेखा विभागाच्या नियंत्रकांच्या परिषदेत बोलत होते. जग भारताच्या संरक्षण क्षेत्राकडे नव्या आदराने पाहत असल्याचं ते म्हणाले.

टेक्सास

अमेरिकेतील मध्य टेक्सासमध्ये मुसळधार पावसामुळं नद्यांच्या पातळीत अचानक वाढ होऊन आलेल्या पूरानं हाहाकार माजवला आहे. या पुरात ९१ नागरिक मृत्यूमुखी पडले आहेत, तर ४० हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत. पुरामुळे नद्यांची धोक्याची पातळी वाढविण्यात आली आहे. शुक्रवारी झालेल्या संततधार पावसामुळं ग्वाडालूप नदीच्या पातळीत अवघ्या एका तासात २६ फुटांपेक्षा जास्त वाढ झाल्याची माहिती टेक्सासचे राज्यपाल डैन पैट्रिक यांनी दिली.

इथल्या मदत छावण्यांमध्ये ७०० मुलं होती. प्रभावित भागात शोध आणि मदत कार्य युद्धपातळीवर सुरू असल्यांचही त्यांनी सांगितलं. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प येत्या शुक्रवारी टेक्सासला भेट देणार आहेत.

नागालँड

नागालँडमध्ये सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी पूर आला असून, भूस्खलन झाल्यानं घरं, रस्ते, पूल कोसळले आहेत. त्यामुळं अनेक ठिकाणांशी संपर्क तुटला आहे. भातशेतीचंही प्रचंड नुकसान झालं आहे. राज्य आपत्ती प्रतिसाद दलासह अनेक संस्था बचाव कार्य करत असून, मदत छावण्या सुरू करण्यात आल्या आहेत. दिमापूरमध्ये, अनेक वसाहतींमध्ये पूर आला असून, ८४४ लोकांना सुरक्षितपणे हलवण्यात आलं आहे. दिमापूरमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

पुरी-नॉर्वे

भारताच्या ऊर्जा क्षमतांना अद्ययावत आणि विस्तारित करण्यासाठी भारत नॉर्वेमध्ये विविध प्रकल्पांचा अभ्यास करत आहे, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायुमंत्री हरदीप सिंह पुरी यांनी म्हटलं आहे. पुरी यांनी काल बर्जेनमध्ये नॉर्दन लाइट्स कार्बन डाय ऑक्साइड टर्मिनलला भेट दिली आणि हायड्रोकार्बन अन्वेषणाच्या विविध पैलूंवर आणि तंत्रज्ञानावर चर्चा केली. या बैठकीत नॉर्वेचे ऊर्जामंत्री जोस्टीन डाहल कार्लसन यांच्यासह तेल आणि वायु क्षेत्रातल्या प्रमुख कंपन्यांचे प्रतिनिधि सहभागी झाले होते. भारत हायड्रोकार्बनचा शोध पुढे नेण्याची योजना आखत असल्याचंही त्यांनी सांगितलं.

भरती मुख्यमंत्री

महाराष्ट्र शासनानं सर्व विभागांना १५० दिवसांचा उद्दिष्टांचा कार्यक्रम दिला आहे. या कार्यक्रमांतर्गत आकृतीबंध, नियुक्ती नियम सुधारित करणं, अनुकंपा तत्वावरील भरती शंभर टक्के करणं आदी उद्दिष्टं दिली आहेत.

या उद्दिष्टपूर्तीनंतर रिक्त पदांची निश्चित माहिती समोर आल्यावर राज्य शासन ‘मेगा भरती’ करेल, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विधानसभेत लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना सांगितलं. मागील काळात शासनानं ७५ हजार पदभरतीचा कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार एक लाखांपेक्षा जास्त पदांची भरती करण्यात आली, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

पुरवणी

महाराष्ट्राच्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात मांडलेल्या पुरवणी मागण्यांपैकी विविध विभागांच्या पुरवणी मागण्यांना काल झालेल्या चर्चेनंतर विधानसभेत आवाजी मतदानानं मंजुरी देण्यात आली. यात गृह विभागाच्या ४२१ कोटी ७२ लाख, कृषी विभागाच्या १३२ कोटी ३३ लाख, तसंच मराठी भाषा विभागाच्या ४५ लाख ७४ हजार रुपयांच्या पुरवणी मागण्यांसह अनेक विभागांच्या मागण्यांचा समावेश आहे.

जनगणना

आगामी जनगणनेची प्रक्रिया पुढच्या वर्षीच्या एप्रिलपासून सुरू होणार असल्याचं नोंदणी महासंचालक आणि जनगणना आयुक्त कार्यालयानं समाज माध्यमांवर जाहीर केलं आहे. सुरुवातीला घरांची नोंदणी आणि मोजणी होईल. त्यानंतर दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्येची गणना

होईल, त्यात जातनिहाय जनगणनेचा समावेश असेल असं त्यांनी कळवलं आहे. यासाठी १ जानेवारी २०२६ ते ३१ मार्च २०२७ दरम्यान प्रशासकीय सीमारेषांमध्ये कुठलेही बदल करू नये असं आवाहन जनगणना आयुक्तांनी सर्व राज्यं आणि केंद्र शासित प्रदेशांना केलं आहे.

रेल्वेमंत्री

केंद्रीय रेल्वमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बिहारसाठी देशभरातील विविध शहरांमधून चार नव्या अमृत भारत रेल्वे सुरू करण्याची घोषणा केली. त्यांच्या हस्ते काल बिहारमध्ये रेल्वेच्या विविध विकासकामांची पायाभरणी झाली, त्यावेळी ते बोलत होते.

या चार रेल्वे गाड्या नवी दिल्ली-पाटणा, दरभंगा- लखनऊ, मालदा-लखनऊ आणि सहरसा-अमृतसर या मार्गांवर धावतील. समस्तिपूर विभागात त्यांनी कर्पुरीग्राम रेल्वेस्थानकातील विकासकामांची पायाभरणीही वैष्णव यांच्या हस्ते झाली.

अमरनाथ यात्रा

अमरनाथ यात्रा सुरळीत सुरू असून काल २३,८५७ भाविकांनी दर्शन घेतलं. पहिल्या सहा दिवसांत दर्शन घेणाऱ्या यात्रेकरूंची संख्या ९३ हजारांहून अधिक झाली असून, आज हा संख्या एक लाखाच्या पुढे जाण्याची शक्यता आहे.
दरम्यान, कडक सुरक्षा व्यवस्थेत काल जम्मूतील भगवती नगर तळावरून ७५४१ यात्रेकरूंची सातवी तुकडी पुढील तळाकडे रवाना झाली. यापैकी ३३२१ यात्रेकरू आज पहाटे बालाताल तळाकडे आणि ४२२० पहलगाम तळाकडे रवाना झाले, तिथून ते अमरनाथकडे निघतील.

तिरंदाजी

तिरंदाजीमध्ये, माजी जागतिक विजेती दीपिका कुमारी आणि आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेती ज्योती सुरेखा वेन्नम आज स्पेनमधील माद्रिद इथं सुरू होणाऱ्या तिरंदाजी विश्वचषकाच्या चौथ्या टप्प्यात सहभागी होणार आहेत. या वर्षाच्या अखेरीस नानजिंग इथं होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेच्या अंतिम फेरीसाठी अव्वल स्थानासाठी ४९ देशांतील ३३६ तिरंदाज भाग घेतील. ही स्पर्धा १३ जुलैपर्यंत चालेल.

विम्बल्डन

विंम्बलडन स्पर्धेत ग्रिगोर दिमित्रोव्हला झालेल्या दुखापतीमुळे ,जागतिक क्रमवारीत अव्वल असलेल्या जॅनुक सिनरला उपांत्य फेरीत प्रवेश मिळाला आहे. दिमित्रोव्हने सिनरला

उपांत्यपूर्व फेरीत सलग सेटमध्ये 6-3, 7-5 नं पराभूत केलं होतं.  मात्र दुखापतीमुळे त्याला सामन्यातून माघार घ्यावी लागली.

हवामान-आयएमडी

देशाच्या अनेक भागात सध्या पाऊस सक्रिय असून छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, चंडीगड, दिल्ली, कोकण, गोवा, मध्य महाराष्ट्र, मध्य प्रदेश, ओडिशा, पंजाब, तेलंगण, उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसाचा इशारा भारतीय हवामान शास्त्र विभागांनं दिला आहे. पुढील चार दिवसांत देशाच्या पश्चिम किनाऱ्यावर, वायव्य भागातही अति मुसळधार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. पश्चिम बंगाल आणि त्याच्या आसपासच्या क्षेत्रात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पुढील तीन दिवसांत मध्य आणि पूर्व भारतात पावसाची शक्यता अंदाज हवामान विभागाने वर्तवली आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.